जा.क्र.संजिप/आवि/एनएचएम/डीएमएचपी /वाहन
/ २४१५ /२०२५.
आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी दिनांक : ०७/११/२०२५.

# वाहन भाडेतत्तावर घेणेसाठी दरपत्रक

राष्ट्रीय असंसर्गजन्यरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय **डीएमएचपी** कक्षासाठी एक वाहन भाडेपद्धतीने घेणेसाठी वाहन मक्तेदारांकडून सिलबंद लखोटयामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत. दरपत्रकाच्या खालीलप्रमाणे अटी व शर्ती असतील.

१) दरपत्रक विहित नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहोचणे आवश्यक आहे.

२) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

**३)** सिलबंद लखोटयावर **राष्ट्रीय आरोग्य अभियान,** डीएमएचपी **कक्षासाठी एक वाहन भाडेतत्तावर पुरविणेसाठी दरपत्रक असा उल्लेख करावा.**

४) वाहन हे टाटा सुमो, बोलेरो, इनोव्हा, अर्टिगा किंवा तत्सम प्रकारातील असणे आवश्यक आहे.

५) वाहन खरेदी एप्रिल २०२० नंतरची असावी.

६) वाहनाची मर्यादित धाव २००० किमी प्रति महा या मर्यादेत निश्चित करणेत आलेली आहे. शासकीय वापराकरिता वाहनाची दरमहा धाव २००० किमीचे अधिन राहून देयक अदा करणेत येईल. वाहनाची धाव २००० किमी पेक्षा कमी झाल्यास २००० किमीचे देयक अदा करणेत येईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये वाहनाची धाव २००० किमी पेक्षा जास्त झाली असेल, तेव्हा झालेले अतिरिक्त देयक दरपत्रकानुसार निश्चित करणेत आलेल्या प्रति किमी दराने अदा करण्यात येईल.

७) वाहन हजर तारखेपासून ३१/०३/२५ या कालावधीपर्यंत ग्राहय राहिल.

८) वाहनधारकाचे वाहन मंजुरीनंतर कार्यारंभ आदेशाच्या ३ टक्के रक्कम अनामत रक्कम म्हणून सिंधुदुर्ग जिल्हा शल्य चिकित्सक सिंधुदुर्ग खातेवर भरणा करणे बंधनकारक राहिल. तसेच १०० रु. चे बॉन्डवर विहित सर्व अटी व शर्थी करारपत्रकावर लिहून देणे बंधनकारक असेल.

९) वाहन सेवा ही २४ X ७ कालावधीसाठी वाहन चालकासह कार्यालयासाठी उपलब्ध असावी, त्यासाठी चालकाला कुठलाही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

१०) दरपत्रकासोबत आरसी बुक, वाहनाचा विमा, प्रवासी वाहतुक परवाना, पॅनकार्ड, वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स ही व आवश्यकतेप्रमाणे इतर प्रमाणपत्रे स्व-साक्षांकित करुन सोबत जोडणे बंधनकारक आहे.

११) पुरविल्या जाणाऱ्या वाहनाची सर्व कागदपत्रे अद्ययावत विमा, नोंदणी पुस्तक, रोड टॅक्स, पेमेंट आवश्यकतेनुरुप राज्यातील कायद्यानुसार सोसायटीला पुरवावी लागतील. या अटी आणीवाणीच्या काळात किंवा बदलीच्या काळात पुरविल्या जाणाऱ्या वाहनासाठी असतील.

१२) दरपत्रक धारकाने सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून आणि समजावून घेवून दरपत्रक सादर करावे. शंका असल्यास त्याबद्दल स्पष्टीकरण घ्यावे. परंतु त्यासाठी दरपत्रक सादर करण्यासाठी दिरंगाई करता येणार नाही.

१३) दरपत्रक धारकाने आपल्या वाहन भाडयाचे दर अंकात आणि अक्षरात अशा दोन्ही स्वरुपात स्पष्ट करावेत. दोन्ही मध्ये फरक आढळल्यास अक्षरी दर वैध ठरविला जाईल.

१४) दरदत्रक सादर करताना मुद्रणात झालेली खाडाखोड साक्षांकित करुन पूर्ण स्वाक्षरीसह दरपत्रक धारकाने सादर करावी.

१५) वाहनाच्या चालकाला कार्यालयाच्या परिक्षेत्रात येण्यासाठी सुरक्षेच्या वर्तमान कायद्यानुसार ओळखपत्र काढण्याची जबाबदारी वाहन मक्तेदाराची राहील. ओळखपत्राशिवाय चालकाला कार्यालय परिक्षेत्रात प्रवेश करता येणार नाही. तसेच वाहन चालविण्याचा चालकाची परवान्याची साक्षांकित प्रत कार्यालयास सादर करावी.

Scanned with OKEN Scanner

File No.:

१६) मक्तेदाराने प्रतिष्ठीत अशा विमा कंपनीकडून त्याच्या वाहनाची वाहन आणि प्रवासी यांसह सर्वकर्ष विमा पॉलिसी काढलेली असावी. कंत्राटदाराने मुळ विमा पॉलिसी आणि पॉलिसीचे हप्ते आणि चार्जेस भरले असल्याचे पुरावे सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, एनसीडी जेव्हा मागेल तेव्हा पुरविणे आवश्यक आहे.

१७) वाहन मक्तेदाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांनी मागणी केल्यास आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अस्तित्वात असलेल्या शासकीय नियम आणि कायद्यानुसार आयकर कपात केला जाईल.

१८) कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनांच्या भागांची टायर, ल्युब्रीकंटस, डिझेल आदिंच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत / तशी मागणी करता येणार नाही. याबाबत अंतिम निर्णय जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदुर्ग यांचे राहतील.

१९) ज्या कालावधीत वाहन उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये दुसऱ्या वाहनाची व वाहन चालकाची पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकांतून अथवा सुरक्षा अनामती मधुन वसुल करणेत येईल. कोणत्याही कारणामुळे वाहन उपलब्ध करुन न दिल्यास पहिला एक तास वगळता पुढील प्रत्येक तासासाठी किंवा तासाच्या भागासाठी रु.५०/- (रुपये पन्नास मात्र) इतकी देय रकमेतून वजा केली जाईल अथवा वसुली केली जाईल. याबाबत सर्व अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदुर्ग यांचे राहतील.

२०) देयक सादर करताना लॉगबुक पडताळणी करीता सादर करावे. वाहन वापरलेल्या अधिकाऱ्याची सही लॉगबुकवर घेणे बंधनकारक आहे. लॉगबुक सादर न केल्यास देयके पारीत करता येणार नाहीत. परिपुर्ण लॉगबुक सादर करणेची जबाबदारी वाहनधारकाची राहिल.

२१) कोणतेही कारण न देता वाहनासाठी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदुर्ग यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र. | वाहनाचा सविस्तर तपशिल | रक्कम प्रति किमी |
|---|---|---|
| १ | टाटा सुमो, बोलेरो, इनोव्हा, इर्टिगा किंवा तत्सम प्रकार | |

दरपत्रके सिलबंद लखोटयात दिनांक 13/11/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यंत एनएचएम विभाग जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग कार्यालयिन टपालात आणून देणेची आहेत. सदर दरपत्रके दि.14/11/२०२५ रोजी सका. ११.०० वाजता सहभागी मक्तेदारांचे उपस्थितीत उघडण्यात येतील. संबंधित वाहन मक्तेदारांनी दरपत्रक उघडतेवेळी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. अनुपस्थित राहणा-या मक्तेदारांचे हरकतीची दखल घेतली जाणार नाही. याची मक्तेदारांनी नोंद घ्यावी.

Civil Surgeon
Sindhudurg

जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner